# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४

E-Mail : gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/३७६६/२०२०

दिनांक १५/०३/२०२०

## परिपत्रक

**विषय :– राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

संदर्भ :–
१) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.५८/आयोग्य–५, दिनांक १४ मार्च २०२०.
२) उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट शासन यांचे पत्र क्रमांक संकिर्ण–२०२०/सं.क्र.११४/२०/विशि–१, दिनांक १४ मार्च २०२०.
३) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक उशिस/कोरोना/मवि–१/२०२०/३७७८, दिनांक १४ मार्च २०२०.
४) सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्रमांक उशिनाग/आस्था/सर्व महा/१४३४/२०२०, दिनांक १४ मार्च २०२०.

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रान्वये शासनाद्वारे कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करण्यात आल्याचे व कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालय, आयुक्त व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत, तथापि, या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या तसेच विद्यापीठांच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला असल्याचे कळविले आहे.

**महाराष्ट्र शासनाच्या वरील संदर्भिय पत्रांना अनुसरून कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधक उपाययोजनेच्या दृष्टीने खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहे.**

१. विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांतील व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापनाचे कामकाज दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद राहील, मात्र सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील व संलग्नित महाविद्यालयातील तसेच प्रशासकीय विभागातील प्रशासकीय व इतर आवश्यक कामकाज सुरू राहील.

२. ज्या विद्यार्थ्यांना सुटी दिलेली आहे, ते अनावश्यकरित्या फिरणार नाहीत तसेच वसतिगृहामध्ये, त्यांच्या घरामध्ये स्वत:ला सुरक्षित ठेवतील अशा स्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. अन्यथा त्यांना त्यांच्या मूळ गावी जाण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. जे विद्यार्थी विद्यापीठ परिक्षेत्रात राहतील त्यांच्याही निदर्शनास ही बाब आणावी. कोणी अनावश्यकरित्या शहरात फिरतांना आढळल्यास त्यांच्याविरूध्द कार्यवाही होऊ शकेल, याची जाणीव त्यांना द्यावी.

३. विद्यापीठाच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार होतील. उपरोक्तप्रमाणे जी बंधने घालण्यात आलेली आहेत ती बंधने परीक्षार्थी विद्यार्थ्यांना लागू राहणार नाहीत. त्यासाठी त्यांनी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) व ओळखपत्र सोबत बाळगावे व आवश्यक असल्यास ते दर्शवावे. परीक्षेच्या वेळी आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी संबंधितांनी घ्यावी. परीक्षेबाबत शासनाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास तसे कळविण्यात येईल.

४. विद्यापीठ परीसरातील वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर कालावधीत त्यांच्या मूळ गावी जाण्याच्या पर्याय उपलब्ध आहे. या काळात वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने शक्यतो वसतीगृहाबाहेर जाऊ नये.

५. प्रतिबंधक उपाय योजनेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या विभागातील, संलग्नित महाविद्यालयातील खालील सुविधा सदर कालावधीत बंद राहतील.

- वाचनकक्ष, कमवा व शिका योजना व सर्व क्रिडा सुविधा.

६. विद्यापीठात पुर्वपरवानगीशिवाय सर्व अभ्यागतांना सदर कालावधीसाठी प्रवेश वर्जित करण्यात येत आहे.

७. विद्यापीठाच्या प्रवेशद्वारातूनच केवळ विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यांना शक्यतोवर विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र पाहूनच प्रवेश दिला जाईल.

८. बायोमॅट्रीक व्यवस्था सदर कालावधीत बंद राहील.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव

**प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषित :**

१. विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागाचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य.
३. विद्यापीठाच्या वसतीगृहांचे वार्डन व अधिक्षक.
४. विद्यापीठातील सर्व अधिकारी व युनिटप्रमुख यांनी उपरोक्त परिपत्रकानुसार आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही घ्यावी.

**महाराष्ट्र शासन**

**अत्यंत तातडीचे**

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉम्प्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १४ मार्च २०२०

प्रति,

अपर मुख्य सचिव
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, उच्च व तंत्रशिक्षण
मंत्रालय, मुंबई

आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण, पुणे
संचालक, शालेय शिक्षण, पुणे / उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई

**विषय:** राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..

शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहे.

करोना विषाणूमुळे होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तथापि, या सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील १० व १२ च्या परिक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या परिक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्या असाही निर्णय घेण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधीत संस्था प्रमुखास देण्यात याव्यात.

वरी उपरोक्तनुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)
प्रत प्रधान सचिव (नगरविकास - २) मंत्रालय, मुंबई
प्रत आयुक्त, महानगरपालिका, (सर्व)

महाराष्ट्र शासन

**अत्यंत तातडीचे**

क्रमांक : संकिर्ण-२०२०/(सं.क्र.(११४/२०)/विशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दि. १४ मार्च, २०२०.

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय : राज्यात करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**संदर्भ : सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१४/०३/२०२०.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे सोबत जोडलेले संदर्भाधिन पत्र कृपया पहावे.

२. शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि.१३/०३/२०२० पासून लागू करुन खंड-२, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

३. करोना विषाणूचा होणारा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदींनुसार दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन पत्राव्दारे सूचित करण्यात आले आहे.

४. तथापि या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या तसेच विश्वविद्यालयांच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे. तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना देखील संदर्भाधिन पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

५. त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की,उपरोक्त सूचना विचारात घेऊन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी/अनुदानित/खाजगी शैक्षणिक संस्था/महाविद्यालये /अकृषी विद्यापीठे दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत आपल्या स्तरावरुन सर्व संस्थाप्रमुखांना तात्काळ सूचित करण्यात यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(सतीश ज. तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- माहितीस्तव तथा आवश्यकत्या कार्यवाही करिता,

१. कुलगुरु/कुलसचिव,सर्व अकृषि विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य.
२. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
३. कुलगुरू, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
४. निवड नस्ती (विशि-१)

**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११२५३.


क्र.उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/3778 दिनांक-१४/०३/२०२०.

ईमेलद्वारा/अतितात्काळ

14 MAR 2020

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

विषय- राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत...

संदर्भ- शासनपत्र क्र.संकीर्ण-२०२०/(सं.क्र.) /(११४/२०)/विशि-१, दिनांक १४ मार्च २०२०.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्राची प्रत सोबत जोडली आहे. अवलोकन करावे.

शासनाने करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये सुचित करण्यात आलेले आहे.

तथापि या सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या तसेच विश्वविद्यालयांच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे. आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सुचना देखील सार्वजनिक आरोग्य विभागाचे पत्र दिनांक १४/०३/२०२० नुसार देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त सुचना विचारात घेऊन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे आणि शासकीय/अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत, विद्यापीठाच्या प्रात्यक्षिक व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेणे, त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता घेणे याबाबतच्या सुचना आपल्या अधिनस्त सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे आणि शासकीय/अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालयांना देण्यात याव्यात.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- कुलसचिव, सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे.

प्रत- प्राचार्य, सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये.

प्रत- मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव.

प्रत- मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीस्तव सादर.

D:\March 2020\Coronavirus.docx

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
# सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१
Web : www.jdnagpur.in
E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : jdhengp@gmail.com
फोन नं. ०७१२-२५६१७१३ फॅक्स न. ०७१२-२५५४२१०

क्रमांक : उशिनाग/आस्था/सर्व महा./१४३४/२०२० दिनांक : १४.०३.२०२०

ई-मेलव्दारे/अतितात्काळ

प्रति,

१. कुलसचिव,
रा.तु.म.नागपूर विद्यापिठ,नागपूर/गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली/
कविकुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक/नॅशनल लॉ युनिवरसिटी, नागपूर.

२. संचालक/प्राचार्य/वसतीगृह प्रमुख
सर्व शासकीय संस्था/महाविद्यालय/वसतीगृह, नागपूर विभाग.

३. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित,
कायम विना अनुदानित महाविद्यालये, नागपूर विभाग.

**विषय : राज्यात करोना विषाणू(कोव्हिड १९) चा प्रादुभार्व रोखण्यासाठी प्रविबंधात्मक उपाययोजना करणेबाबत...**

**संदर्भ : १. सार्वजनिक आरोग्य विभाग प्रत्र क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१४.०३.२०२०.**
**२. शासनाचे पत्र क्र.संकीर्ण-२०२०/सं.क्र.(११४/२०)/विशि-०१, दि.१४.०३.२०२०**
**३. संचालनालयाचे पत्र क्र.उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३७७८, दि.१४.०३.२०२०.**

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे.(प्रत सोबत जोडलेली आहे.)

शासनाने करोना विषाणूचा(कोव्हिड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि.१३.०३.२०२० पासून लागू करून खंड-२, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेल्या आहे.

करोना विषाणूचा होणारा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतूदीनुसार दि.३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये सुचित करण्यात आलेले आहे.

तथापि या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या तसेच विश्वविद्यालयाच्या प्रात्याक्षिके व परिक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आलेला आहे. आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठो आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सुचना देखील संदर्भिय पत्रानुसार देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने नागपूर विभागातील वरील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व शासकीय संस्था/महाविद्यालये/वसतिगृहे, सर्व अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी महाविद्यालये दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्यात यावी. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या प्रात्याक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेणे, त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी. तसेच संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या इतर सुचनांचे पालन करावे.

सहपत्र : वरीलप्रमाणे संदर्भिय पत्रे.

**(डॉ.महेशकुमार साळुंखे)**
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

प्रत :

१. मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२.

२. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.